धक्का!
सुराज्य
सोमवार दि.१८ मार्च २०२४ । पान १२

# भाजपची 'टॉप सिक्रेट' फाईल!




सोलापूर लोकसभेचा भाजपाचा उमेदवार कोण? याबद्दल उत्सुकता प्रचंड शिगेला पोहचली. तथापि, भाजपानं इथल्या उमेदवारीबद्दल प्रचंड गुप्तता ठेवली आहे. केवळ मुंबई भाजपचं काय तर दिल्लीमध्येदेखील सोलापूरच्या उमदेवारीबद्दल कोणाला काही कळू दिलं जात नसल्याची माहिती समोर येत आहे. प्रणिती शिंदेंना टक्कर देणारा एकतर सक्षम महिला उमेदवारीचा चेहराच दिसेना. पुरूषांमध्ये जे इच्छुक आहेत, त्यांच्या टिकाव लागेल की नाही याची शाश्वती वाटत नाही. शिवाय सर्वात महत्वाची बाब उमेदवार हा स्थानिक पाहिजे, या मुद्याची भाजपाला मोठी डोकेदुखी झाली आहे. सर्वच प्रकारचे प्रयत्न करुनही प्रणिती शिंदे या भाजपाचं 'कमळ' हाती घेण्यास राजी होईनात त्यामुळे सोलापूरच्या लोकसभेच्या उमेदवारीचं ठरवायचं तरी कस अन् काय? हा दाडंगा पेच भाजपावाल्यांपुढे आहे.

## शिवाजी भोसले

दरम्यान, आमदार प्रणिती शिंदे यांच्या भाजपा प्रवेशाचा विषय जर कायमचा संपला असेल तर त्यांच्या विरोधात सोलापूर लोकसभेच्या आखाड्यासाठी भाजप दे धक्का उमेदवार देऊ शकते. तथापि, धक्का देणारा असा कोणता चेहरा असेल याचा अंदाज लावणं खुद्द भाजपच्या वर्तुळात कठीण झालं आहे. संकटमोचक म्हणून ख्याती असलेल्या मंत्री गिरीश महाजन यांनी परवा सोलापूर दौरा करुन इथल्या आमदार तसेच प्रमुख कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करुन पडताळणी केली. उमेदवार हा स्थानिकच असायला हवा, प्रणिती शिंदेंना फाईट देणाराच पाहिजे, इथल्या मतदार संघात विजयाची हॅट्रिक साधताना उमेदवारदेखील तसाच तगडा हवा. जे मुद्दे होते ते मंत्री महाजन यांनी लोकसभेच्या महाराष्ट्रातील उमेदवाऱ्या देण्यामध्ये पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य ज्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे अशा देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सांगितले. महाजन आणि फडणवीस या उभतांमध्येही सोलापूरच्या उमेदवारीवरुन चर्चेचा किस पडला. तथापि, कोणतेच नाव निश्चित झाले नसल्याची माहिती भाजपाच्या अत्यंत वरिष्ठ सुत्रांकडून मिळतेय.

### गेटकेन उमेदवारीची नाही का चिंता

स्थानिकच उमेदवार हवा असा हट्ट सोलापूरच्या उमेदवारीबद्दल आहे. हा हट्ट भाजप आमदार, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्त यांच्यापेक्षा येथील जनतेचा आहे. जनभावनेच्या विरोधात जाऊन जर उमेदवारीचा निर्णय घेतला तर किंमत मोजावी लागेल ही भीती भाजपाला नक्कीच आहे. अशातही राखीव मतदार संघ आणि प्रणिती शिंदेना फाईट देणारा युवा चेहरा म्हणून गेटकेन आमदार राम सातपुते यांना सोलापूर लोकसभेत आणले जाणार असेल तर परका उमेदवार म्हणून प्रणिती शिंदेंच्या विरोधात ते तग धरु शकणार नाहीत, असे राजकीय जाणकार सांगतात. बाहेरील आणि स्थानिक अशी जेव्हा तुलना होईल, त्यावेळी हक्काची ताई... प्रणिती ताई... हा गुंजणारा नारा प्रभावशाली ठरेल असा राजकीय जाणकरांचा अंदाज आहे.

### अफवांचं पीक अन् चर्चेचं गुऱ्हाळ

सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात भाजपचा उमेदवार ठरता ठरेना. पक्षाच्या उमेदवारीवरुन प्रचंड घमासान सुरु आहे. वाढत्या उन्हानं वातावरणामधली गरमी प्रचंड वाढलेय तशी लोकसभेच्या उमदेवारीवरुन राजकीय गरमी वाढताना वातावरण अक्षरशः ठवळून निघालंय. जागोजागी लोकसभेच्या उमदेवारीचाच विषय आहे. भाजपा आणि काँग्रेसकडून अद्याप कोणाच्याच नावावर उमदेवारीची मोहर उमटवलेली नसली तरी मतदार संघात उमेदवारीवरुन अफवा आणि चर्चेचं मायंदाळ गुऱ्हाळ सुरु आहे. आमदार प्रणिती शिंदे यांची काँग्रेसकडून उमदेवारी निश्चित होत नाही. तेव्हा भाजपामध्ये जाण्याचा विषय त्यांनी संपविला नाही का? शिवाय दुसरीकडे माढ्याचा उमेदवारीचा विषय भाजपाने संपविला असताना सोलापूरच्या उमदेवारीचा विषय निर्णयाविना का ठेवला? भाजपाने प्रणिती शिंदे यांचा पक्ष प्रवेशाचा चॅप्टर क्लोज का केला नाही? प्रणिती प्रवेश करतील अशी भाजपला अजूनही आशा वाटते का? त्यादृष्टिने अत्यंत वरिष्ठ पातळीवर काय हालचाली सुरु आहेत का? प्रणिती यांच्या निवडणुकीसाठी सोलापूर मुक्कामी आलेले सुशीलकुमार शिंदे यांनी तातडीने मुंबई का गाठली असावी? वेगळी खलबते सुरु आहेत का? या आणि अशा चर्चा आणि अफवा सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात पसरत आहेत. माजी खासदार अमर साबळे, आमदार राम सातपुते, माजी खासदार अ‍ॅड. शरद बनसोडे, राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यासह अनेकजण भाजपाकडून उमेदवारी मिळण्यासाठी इच्छुक आहेत. त्यांच्या उमदेवारीचादेखील अफवा आणि चर्चेचा विषय आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चा रंगत आहेत. उमदेवारीबद्दल अंदाज, तर्क-वितर्क लढविण्याला अक्षरशः उधाण आलं आहे. उमेदवारीबद्दल जाणून घेण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये फोनाफोनी सुरु राहात आहे.



### इकडे आड... तिकडे विहिर !



सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात आमदार प्रणिती शिंदे वगळता काँग्रेसकडे कोणत्याच कसोटीवर टिकणारा दुसरा चेहरा नाही. 'वन मॅन आर्मी' याप्रमाणे सोलापूर लोकसभेच्या काँग्रेस उमेदवारीबाबत प्रणिती शिंदे याच हुकमी एक्का आहेत. तथापि, काँग्रेसकडून त्यांचे नाव निश्चित होत नाही. या पक्षाच्या उमेदवारांची जी यादी घोषित झाली. त्यामध्ये प्रणिती शिंदे यांचे नाव येईल, याची महाविकास आघाडीवाल्यासह विरोधकांना खात्री होती. मात्र तसे झाले नाही. आमदार प्रणिती शिंदे यांच्या उमेदवारीवर भाजपला आपल्या उमेदवारीची रणनिती आखायची आहे. प्रणितींना तुल्यबळ कसा उमेदवार देता येईल, ते पाहायचे आहे. दरम्यान, आमदार प्रणिती यांचेच नाव निश्चित होत नसल्याने भाजपवाल्यांची कोंडी झाली आहे. भाजपाकडून सोलापूर लोकसभा लढवू इच्छिणारे जे चेहरे आहेत, त्यामध्ये प्रणितींना फाईट देणारा सक्षम चेहरा भाजपाला सापडत नसावा. तरीपण उमेदवार तर द्यावाच लागेल हे लक्षात घेता एकदा का प्रणिती शिंदे यांची काँग्रेसकडून उमदेवारी निश्चित झाली की त्यांच्या विरोधात उमदेवारीची टाकलेली कोणती सोंगटी कामी येईल, याचा अंदाज भाजपाला बांधता येणार आहे. त्यासाठी काँग्रेसकडून होणाऱ्या उमेदवारीच्या घोषणेची प्रतीक्षा भाजपाला आहे.

# माळशिरस तालुक्याला खंत... सोलापूर लोकसभेत खदखद...

राम सातपूते यांच्या रुपानं स्वातंत्र्यानंतर जनतेच्या मनातला आमदार आम्हा माळशिरस तालुकावासियांना मिळाला, तो आमच्या हक्काचा आमदार सोलापूर लोकसभेला नेला जातोय, एका चांगल्या नेतृत्वाचा बळी दिला जातोय, याची मोठी खंत आहे, अशा प्राातानिधीक प्रतिक्रिया राम सातपुते यांचे नाव सोलापूर लोकसभेसाठी पुढे आल्यावर आज रविवारी माळशिरस व्यक्त करण्यात आल्या. तर आम्हाला स्थानिक उमेदवार हवाय, आम्हाला गेटकेन उमेदवारीचा चेहराच नको, तरीही भाजपाने गेटकेन उमेदवारी आम्हा सोलापूरकरांवर लादल्यास गेटकेन पार्सल आम्ही परत पाठविल्याशिवाय राहणार नाही, भाजपाने प्रत्येक वेळी दिलेल्या उमेदवाराला आम्ही निवडून दिलं, या पक्षाची कदर केली. आता पक्षाने सोलापूरकरांच्या जनभावनेची कदर करावी अशा प्रतिक्रिया दुसरीकडे सोलापुरातून प्रातिनिधीक स्वरुपात व्यक्त केल्या गेल्या. यावरुन आमदार राम सातपुते यांच्याबाबतीत माळशिरस तालुक्यात खंत आणि सोलापुरात मात्र खदखद असेच वस्तुनिष्ठ चित्र असल्याचे समोर येत आहे.



मुळचे बीड येथील रहिवासी असलेल्या राम सातपुते यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माळशिरस तालुक्याचा आमदार केले. यासाठी त्यांनी अनेक तडजोडी केल्या. अकलूजकर मोहिते-पाटलांदेखील ताकद दिली. आमदार राम सातपुते यांनी फडणवीस पर्यायाने भाजपाने टाकलेला विश्वास सार्थ केला. आपल्या कर्तृत्वानं 'आपल्या हक्काचा आमदार' अशी ख्याती या तालुक्यात त्यांनी मिळविली. रस्ते, वीज, पाणीपुरवठा या मूलभूत सुविधा पुरविण्यावर सातपुते यांनी मोठे काम केले. कोणाच्या मध्यस्तीशिवाय भेटणार आमदार म्हणून वेगळी ओळख निर्माण केली.

शासनाच्या निधीतून आरोग्याच्या सुविधा देऊन हजारोजणांचे वाचविलेले प्राण असो की तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत तसेच नातेपुते, श्रीपूर-महाळुंग नगरपंचायत, माळशिरस व अकलूज नगरपरिषद असो यांना कोट्यावधी रुपयांचा निधी देऊन विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. कधीही गटातटाचं व सुडाचं राजकारण न करता जात-पात, धर्म, पक्ष यापलिकडे जाऊन त्यांनी आमदार म्हणून या माळशिरस तालुक्याला न्याय दिला. स्वतंत्र विचारसरणीचा, थेट भेटणारा, जनतेच्या सुखादुःखात सोबत असणारा आमदार म्हणून सातपुते यांची या तालुक्यात ख्याती आहे. मात्र, असं असताना त्यांना सोलापूर लोकसभेच्या आखाड्यात राखीव प्रवर्गाचा चेहरा आणि आमदार प्रणिती शिंदे यांना फाईट देणारं युवा नेतृत्व म्हणून उतरविण्याचा घाट घातला जात आहे. त्याबद्दल माळशिरस तालुक्यातील जनभावनेचं मत विरोधात आहे. तसं ते सोलापूर लोकसभेच्या मतदार संघाहीत विरोधात आहे. फरक आहे तो स्थानिक आणि परका याबद्दलचा.

सोलापूर लोकसभा मतदार संघातील नागरिकांना आपला खासद ार हा आपल्या जिल्ह्यातील हवा आहे. यापूर्वी गेटकेन खासदारकीचा त्यांना आलेला वाईट अनुभव लक्षात घेता स्थानिक उमेदवारीकडेच येथील जनभावनेचा कल आहे. त्यामुळे उमेदवारी जाहीर होण्याच्या टप्प्यावर आमदार राम सातपुते आणि माजी खासदार अमर साबळे या परक्या उमदेवारांविरोधात जनमत आहे.

### स्थानिकच्या मुद्यावर फिरणार वारं

सोलापूर लोकसभेतील मतदारांच्या जनभावनेचा विचार न करता भाजपाने गेटकेनची उमेदवारी सोलापूकरांवर लादल्यास उलट वारं फिरु शकतं. सोलापूर लोकसभेच्या सर्वच विधानसभेच्या मतदार संघात भाजपाची ताकद आहे. येथील भाजपाचे स्टॅंडिंग आमदार आहेत, असे गणित घालून जर गेटकेन उमेदवारी भाजपाने रेटलीच तर स्थानिक उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या पथ्यावर पडणार आहे.

### ॲड.शरद बनसोडेंना फडणवीसांचा फोन



सोलापूर लोकसभेची निवडणूक दुसऱ्यांदा लढण्यासाठी सज्ज असलेले माजी खासदार अ‍ॅड. शरद बनसोडे यांनस आज रविवारी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला. त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तयारीत आहात का? असा प्रश्न विचारुन तयारीबद्दल माहिती घेतली. या संदर्भात खुद्द अ‍ॅड. बनसोडे यांनीच माहिती दिली. सोलापूर लोकसभेच्या तयारीबद्दल फडणवीस यांनी माझ्याकडून तपशीलवार माहिती घेतल्याचे ते म्हणाले. रविवारी दिवसभर माळशिरसचे आमदार राम सातपुते यांचे सोलापूर लोकसभेसाठी नाव निश्चित झाल्याच्या बातम्या खास करुन विविध वृत्तवाहिन्यांमधून प्रसारीत होत होत्या. अशातच महाराष्ट्रातील भाजपा उमेदवारांच्या संदर्भात निर्णायक भूमिकेत असलेल्या देवेंद्र फडणवीस यांचा फोन माजी खासदार अ‍ॅड. बनसोडे यांना आला आणि पुन्हा उमेदवारीवरुन वेगळा गोंधळ उडाला.




# ठरलेला सामना





## सचिन आपसिंगकर

सोलापूर जिल्ह्यातील राजकीय दृष्ट्या संघर्षमय, अस्वस्थ आणि अशांत तालुका अशी बार्शीची ओळख. निवडणूक ग्रामपंचायतची असो की लोकसभेची कोणत्याही निवडणुकीत इथे सोपल गट आणि राऊत गट बाह्या सरसावून प्रत्येकवेळी भिडतातच. गेली तीन दशके इथली राजकीय गटबाजी गाजते आहे. पक्ष नावाचा प्रकार बार्शीत नाही. इथले राजकारण व्यक्ती केंद्रित आहे. अशा या बार्शी विधानसभा मतदारसंघात लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर उघड राजकीय हालचाली आणि भूमिगत मांडणीला वेग आला आहे.

तीन वर्षांपूर्वी वैराग नगरपंचायतीची निवडणूक भाजप , शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी अशी पक्षीय चिन्हांवर झाली. त्यानंतर राज्यात अवतरलेल्या भाजप व शिवसेना सरकारमुळे बार्शी तालुक्याच्या राजकारणावर ही मोठे पडसाद उमटले. बार्शीत येऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार राऊत यांची प्रशंसा केली व महत्त्वकांक्षी अशा उपसा सिंचन योजनेसाठी ६०० कोटींचा निधी जाहीर केला. गेली वर्षभर आमदार राऊत प्रचंड सक्रिय आहेत. तालुक्याला मोठा विकास निधी मिळतो आहे. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत आमदार राऊत महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी राहणार हे उघड आहे. दरम्यान, तुलनेने २०१९ साली पराभव झाला तरी अभूतपूर्व राजकीय समीकरणे जुळली आणि महाविकास आघाडी सरकार आले. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी मध्ये दीर्घकालीन संबंध असल्यामुळे सोपल व त्यांचे समर्थक उत्साहात होते. पण महाविकास आघाडी सरकार पायउतार झाल्यामुळे सोपल गटाच्या उत्साहावर विरजणे पडले. सध्या सोपल गट राजकीय दृष्ट्या बचावात्मक पवित्र्यामध्ये आहे. सोपल गटाची मोठी पडझड झाली आहे. अनेक निष्ठावंत समर्थक दुरावले आहेत. मात्र, सोपल राज्याच्या राजकारणातले वेगळे अनुभव समृद्ध रसायन आहे. परिस्थितीचा अभ्यास करत आणि अंदाज घेत कधी शांत बसायचे आणि कधी मुसंडी मारायची हे त्यांना चांगलं माहित आहे. त्यांनी राजकारणावर मौन बाळगलं असलं तरी त्यांची पडद्यामागून सूत्र हलविणारी कार्यपद्धती जागृत आहे. आपल्या परीने हितचिंतकांची गोळाबेरीज करत आहेत.

### बार्शी कायमच किंगमेकर

२००४ साली कल्पना नरहिरे , २००९ साली डॉ. पद्मसिंह पाटील, २०१४ ला रवींद्र गायकवाड आणि २०१९ ला ओमराजे निंबाळकर यांच्या विजयात मोठा वाटा उचलत बार्शी विधानसभा मतदार संघ कायम किंगमेकरच्या भूमिकेत राहिला आहे.

### उमेदवारीवरुन तर्क-वितर्क

१९९९ साली बार्शीच्या उमेदवाराने शिवाजी कांबळे यांच्या रूपात खासदारकीही पटकावली आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघात महायुतीची उमेदवारी कोणाला मिळते याबाबत उत्सुकता आहे. विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांची महाविकास आघाडी कडून उमेदवारी निश्चित आहे.खासदार ओमराजेंनी बार्शी तालुक्यात चांगला संपर्क ठेवला आहे त्यांना व्यक्तिगत माननारा वर्ग तालुक्यात तयार झाला आहे. मात्र निंबाळकर यांना आमदार राऊत यांच्या प्रबळ राजकीय वर्चस्वाला सामोरे जावे लागणार आहे. महायुतीचा उमेदवार भाजपाचे नुकतेच प्रवेश केलेले माजी मंत्री बसवराज पाटील, माजी सनदी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी की शिवसेनेकडून राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत याबाबत तर्क वितर्क लढविले जात आहेत. महायुतीचा उमेदवार जाहीर झाल्यानंतरच पुढची राजकीय समीकरणे स्पष्ट होतील.

# संघर्षयोध्दे सज्ज